जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक १८५ | रविवार, २५ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### पुणे-सोलापूर महामार्गावर भिगवणनजवळ अपघात

भिगवण, ता. २४ : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर भिगवणजवळील बीट कंपनी परिसरात सोलापूरच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या इनोव्हा कारचा अचानक टायर फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटलेली इनोव्हा कार थेट दुभाजक ओलांडून पुणे बाजूकडून येणाऱ्या एका कारला जोरदार धडकली. या अपघातात तीन जण जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची तीव्रता इतकी होती की दोन्ही कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भरधाव वेग आणि अचानक टायर फुटल्यामुळे इनोव्हा कारने दुभाजक तोडत समोरून येणाऱ्या कारला धडक दिली, त्यामुळे हा भीषण अपघात झाला. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी वाहतूक सर्व्हिस रोडवरून वळवली.

# ‘समर्थ क्रॉप केअर’ कंपनीच्या प्रशांत गवळीला सात दिवसांची पोलीस कोठडी


## १२५ कोटी रुपयांची कथित ऑडिओ क्लीप व्हायरल; ईडी कधी कारवाई करणार?

**विशाल कदम**

लोणी काळभोर, ता. २४ : हडपसर (पुणे) येथील समर्थ क्रॉप केअर कंपनीचे मालक प्रशांत गवळी व त्याच्या सहकाऱ्यांनी शेतकऱ्यांना शेतातील माल इम्पोर्ट एक्स्पोर्ट करण्याच्या नावाखाली व प्रतिमाह १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांना कोट्यावधी रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रशांत गवळी व त्याच्या सहकाऱ्यांवर हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर पुणे शहर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने गुरुवारी (ता. २२) रात्री अटक केली होती. अटक केल्यानंतर प्रशांत गवळीला न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने प्रशांत गवळीला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

प्रशांत गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांवर हडपसर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३४० (२), ३१६ (५), ३ (५), ६१ (२) व महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण) अधिनियमन १९९९ चे कलम ३ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी लक्ष्मी विजय बर्लाल (वय ६१,रा. १४७ सोमवार पेठ, त्रिशुंढ गणपती समोर, आत्रे वाडा, पुणे) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

प्रशांत गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ५ टक्के नफा व ५ टक्के मुद्दल रक्कम अशा प्रकारे एकुण १० टक्के परतावा देण्याचे आमीष दाखवुन पुणे, सोलापूर, नगरसह राज्यातील १२ हून अधिक जिल्ह्यातील ४० ते ४५ हजार गुंतवणूकदारांकडून ४ हे ५ हजार कोटी रुपयांची बेकायदा माया गोळा केली आहे. परंतु, पुणे प्राईम न्यूजने हा घोटाळा उघडकीस आणल्यामुळे आपला कधीही भांडाफोड होईल म्हणून त्याने मागील पाच महिन्यांपासून गुंतवणूकदारांना परतावा देणे बंद केले होते. त्याच्याकडे



मुद्दल व परतावा मागण्याचा तगादा लावल्यानंतर गुंतवणूकदारांना त्याच्या गुंडांकडून धमकीवजा इशारादेखील देण्यात आल्या होता.

दरम्यान,प्रशांत गवळीच्या धमक्यांना न घाबरता काही गुंतवणूकदारांनी थेट पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्यानंतर हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच, पुणे शहर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने गुरुवारी (ता.२२) रात्री अटक केली होती. अटक केल्यानंतर प्रशांत गवळीला न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने प्रशांत गवळीला सात दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली आहे.

**घोटाळ्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता**

आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, चौकशीत आणखी गुंतवणूकदार पुढे येण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे आतापर्यंत समोर आलेल्या रकमेपेक्षा फसवणुकीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. तपासादरम्यान गवळीच्या मालमत्ता, बँक खाती तसेच परदेशी व्यवहारांचीही सखोल छाननी केली जाणार आहे.

**आपले पैसे परत मिळणार का?**

प्रशांत गवळीच्या अटकेमुळे गुंतवणूकदारांमध्ये काही प्रमाणात समाधान व्यक्त होत असले, तरी ते हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे नेमके काय होणार, हा प्रश्न अद्यापही अनुत्तरित आहे. हजारो गुंतवणूकदारांचे आयुष्यभराचे कष्टाचे पैसे या घोटाळ्यात अडकले असून, तपासातून मुद्दल व मालमत्तेचा शोध लागतो का आणि न्यायालयीन प्रक्रियेतून रक्कम परत मिळते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**१२५ कोटी रुपयांची कथित ऑडिओ क्लीप व्हायरल**

समर्थ क्रॉप केअर कंपनी प्रकरणात प्रशांत गवळीचा सहकारी व माजी सैनिक संदीप लगड याचा१२५ कोटी रुपयांच्या व्यवहारांबाबत बोलणारा कथित ऑडिओ क्लीप सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या ऑडिओ क्लिपमुळे या घोटाळ्याच्या व्याप्तीबाबत नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. संदीप लगड हा सुरुवातीपासूनच प्रशांत गवळीची बाजू घेत असल्याचे दिसून येत असून, आजही तो गवळीच्या समर्थनार्थ भूमिका घेत आहे. याशिवाय दौंड तालुक्यातील एका सामाजिक संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष असलेल्या महिलेनेही गवळीची उघडपणे पाठराखण करत त्याचा गाजावाजा सुरूच ठेवला असल्याची चर्चा आहे.

### पुणे प्राईम न्यूजची समाजोपयोगी भूमिका

पुणे प्राईम न्यूजने वेळोवेळी या प्रकरणाबाबत सातत्याने बातम्या प्रसिद्ध करून जनजागृती केली. त्यामुळे समर्थ क्रॉप केअर कंपनीतील आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आला. या बातम्यांमुळे अनेक संभाव्य गुंतवणूकदार सतर्क झाल्याने भविष्यात होणारी आर्थिक फसवणूक टळण्यास मदत झाली आहे. समाजहिताची भूमिका निभावत पुणे प्राईम न्यूजने जबाबदार पत्रकारितेचा वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

### ईडी कधी कारवाई करणार?

इतक्या मोठ्या प्रमाणावर कोट्यवधी रुपयांचे व्यवहार बेकायदा पद्धतीने झाल्याचे समोर येत असताना, अद्यापही अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) कोणतीही ठोस कारवाई केलेली नसल्याने गुंतवणूकदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मनी लॉन्डरिंग, बेनामी मालमत्ता आणि परदेशी व्यवहारांचा संशय लक्षात घेता ईडी नेमकी कधी आणि कोणावर कारवाई करणार, याकडे संपूर्ण गुंतवणूकदारांचे लक्ष लागले आहे.

# माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या कन्येचा अवघ्या १५० रुपयांत विवाह

**सोलापूर, ता. २४ :** सध्याच्या काळात लग्न म्हणजे लाखो-कोटींचा खर्च, अवाढव्य झगमगाट आणि बडेजाव असेच समीकरण बनले आहे. मात्र, सोलापुरात या सर्व प्रथांना फाटा देत एक अत्यंत प्रेरणादायी आणि आदर्श विवाह पार पडला आहे. माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या कन्येचा विवाह केवळ १५० रुपयांच्या शासकीय शुल्कात नोंदणीकृत पद्धतीने पार पडला असून, या दांपत्याने समाजसेवेचा एक नवा मार्ग दाखवून दिला आहे.

दत्तात्रय सावंत यांची कन्या सुषमा सावंत आणि शुभम शिंदे यांचा विवाह सोलापूर येथील जिल्हा विवाह नोंदणी कार्यालयात अत्यंत साध्या पद्धतीने पार पडला. शुभम शिंदे हे पाणीपुरवठा विभागात शासकीय अभियंता म्हणून कार्यरत आहेत, तर सुषमा यांनी नुकतेच भारती विद्यापीठ, पुणे येथून मानवी शरीररचना विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. दोन्ही नवविवाहित उच्चशिक्षित असून त्यांनी लग्नासाठी होणारा अनावश्यक खर्च टाळण्याचे ठरवले.



> प्रत्येक कुटुंबाला आपल्या मुलांचे लग्न धुमधडाक्यात व्हावे असे वाटते, त्यासाठी कर्जही काढले जाते. पण मी हा विचार मोडीत काढण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या मुलीने आणि जावयाने स्वतःहून हा निर्णय घेतल्याचा मला अभिमान आहे. शिक्षकांसाठी जो संकल्प त्यांनी केला आहे, त्यासाठी मी भविष्यातही काम करत राहीन.
>
> - **दत्तात्रय सावंत,** माजी शिक्षक आमदार

या विवाहाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, शाही सोहळ्यावर होणारा सुमारे २५ ते ३० लाख रुपयांचा खर्च टाळून ती रक्कम विनाअनुदानित शिक्षकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत म्हणून देण्याचा स्तुत्य निर्णय या नवविवाहित दांपत्याने घेतला आहे. या निर्णयामुळे सावंत-शिंदे परिवारावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# झेडपी आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य? महसूल मंत्री बावनकुळे यांची माहिती

**मुंबई, ता. २४ :** नुकत्याच राज्यातील महापालिका निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीनंतर आता राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीची रणधुमाळी उडाली आहे.

या निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारीला मतदान तर ७ फेब्रुवारीला निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे अगदी काही दिवसांवर आलेली ही निवडणूक महत्वाची मानली जात आहे. अशातच या निवडणुकीनंतर स्वीकृत सदस्य घेण्याचा विचार सरकार करत असल्याची मोठी बातमी समोर आली आहे.

महानगरपालिका प्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये देखील स्वीकृत सदस्यांची नेमणूक व्हावी असा प्रस्ताव राज्य सरकारच्या



विचाराधीन असल्याचे मोठं वक्तव्य महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. हा बदल झाल्यास याचा ग्रामीण भागातील राजकारणावर मोठा फरक पडू शकतो, अशी चर्चा रंगली आहे.


महापालिका निवडणुकीत पक्षांकडून अनेकांची नावे स्वीकृत नगरसेवक पदासाठी चर्चेत असतात. पण चर्चेत असलेल्या पैकी काहींना उमेदवारी मिळते. त्यामुळे इतरांची नाराजी होते. किंवा मग मग महत्वाचे उमेदवार पराभूत झाले. त्यांचे पुर्नवसन करण्यासाठी संख्याबळानुसार स्वीकृत सदस्य निवड केले जातात. याच धर्तीवर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य हे महत्त्वाचे राजकीय पद येण्याची शक्यता आहे.

जिल्हा परिषदेत दहा सदस्यामागे एक आणि पंचायत समितीमध्ये पाच सदस्यांमागे एक स्वीकृत सदस्य निवडावा अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. याबाबत शासन आणि मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. येत्या सभागृहात हा कायदा होईल, अशी महत्वाची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. दरम्यान, स्वीकृत सदस्याची नियुक्ती करताना विविध निकष असतात. यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञांची निवड करावी असा नियम आहे. मात्र राजकीय पक्षांकडून कार्यकर्त्यांचीच सोय लावली जात आहे. आता जिल्हा परिषदांमध्ये जर स्वीकृत सदस्य निवडला गेला तर कसे निकष असणार हे पाहणे महत्वाचे असून, निवडणुकीअगोदरच इच्छुकांनी आत्तापासूनच फिल्डिंग लावणे सुरू केले आहे.

# भाजप नेत्याच्या पत्नीला राष्ट्रवादी काँग्रेस तिकीट

**बारामती, ता. २४ :** पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने बारामती तालुक्यात वेगळी आणि धक्कादायक रणनीती अवलंबल्याचे स्पष्ट झाले आहे. काही पंचायत समिती गणांमध्ये अधिकृत उमेदवारच न देता थेट जिल्हा परिषदेवर लक्ष केंद्रीत केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः सुपे आणि शिर्सुफळ गणांत राष्ट्रवादीकडून उमेदवार न उतरविल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यंदा पंचायत समितीपेक्षा जिल्हा परिषदेतील जागांवर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर काही गणांत तडजोडीचे



राजकारण करण्यात आल्याचे बोलले जात आहे. सुपे गणात उज्ज्वला खैरे आणि शिर्सुफळ गणात अनिकेत गावडे यांच्या विरोधात उमेदवार न देण्यामागे हेच राजकीय गणित असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, नीरावागज गटात भाजप नेते अभिजित देवकाते यांच्या पत्नी शिवानी देवकाते यांना राष्ट्रवादीत प्रवेश देत थेट उमेदवारी देण्यात आल्याने भाजपच्या गोटात अस्वस्थता निर्माण झाली आहे. पणदरे गटात मंगेश जगताप यांना जिल्हा परिषदेचे तिकीट देत जुनी नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. निंबूत गटात करण खलाटे, तर नीरावागजमधून नितीन काकडे यांना संधी देण्यात आली आहे.

दुसरीकडे, भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्याकडूनही ताकद एकवटण्याचे प्रयत्न सुरू असून, अर्ज माघारीनंतरच बारामतीतील अंतिम राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे. एकूणच, या निवडणुकीत जागांपेक्षा राजकीय डावपेचच अधिक निर्णायक ठरत असल्याचे चित्र आहे.

# दौंड तालुक्यात माघारीनंतरच स्पष्ट होणार सत्तेचे गणित

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत २२२ उमेदवार रिंगणात

**राहुलकुमार अवचट**

दौंड, ता. २४ : दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक यंदा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तेपुरती मर्यादित न राहता, थेट राजकीय ताकद मोजण्याचा आणि आगामी विधानसभा निवडणुकीची नांदी ठरणारा सामना बनली आहे. उमेदवारी अर्जांच्या माघारीनंतरच तालुक्यातील सत्तेचे नेमकेगणित स्पष्ट होणार असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

दौंड तालुक्यातील सात जिल्हा परिषद गट व १४ पंचायत समिती गणांसाठी बहुपक्षीय लढती रंगणार असून तब्बल २२२ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. जिल्हा परिषद गटांसाठी ११८ तर पंचायत समिती गणांसाठी १५८ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. अर्ज छाननीअंती १७ अर्ज बाद झाले असून आतापर्यंत १० उमेदवारांनी माघार घेतली आहे. मात्र, अद्याप अनेक जागांवर मोठ्या प्रमाणात उमेदवार कायम असल्याने बहुरंगी लढती अटळ ठरणार आहेत.

काही गट व गणांमध्ये नऊ तर काही ठिकाणी तब्बल २० उमेदवार असल्याने सर्वत्र चौरंगी व पंचरंगी लढती पाहायला मिळणार आहेत. विक्रमी उमेदवारी अर्ज, आघाड्या-




युतींचे गुंतागुंतीचे राजकारण, बंडखोरी आणि अपक्ष उमेदवारांची वाढती संख्या यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. त्यामुळे ही निवडणूक सत्तेचा महासंग्राम ठरत असल्याचे चित्र आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून दौंड तालुक्याचे राजकारण आमदार राहुल कुल आणि माजी आमदार रमेश थोरात यांच्या भोवती फिरत आले आहे. राज्यात भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांची युती असली, तरी दौंड तालुक्यात अनेक ठिकाणी या तिन्ही पक्षांमध्येच थेट लढत होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

दरम्यान, खडकी देवळगाव राजे गटातून काँग्रेस (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष आप्पासाहेब पवार यांना ऐनवेळी उमेदवारी देण्यात आल्याने भाजपाचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे यांच्या मुलीला उमेदवारी नाकारण्यात आली. यामुळे भाजपमध्ये अंतर्गत नाराजी असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. शिवसेना, काँग्रेससह अन्य पक्षांनीही उमेदवार उभे केल्याने अपक्षांची संख्या वाढली असून मतविभाजन कोणाच्या पथ्यावर पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मंगळवारी (ता. १७) दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघारीची मुदत असून, त्यानंतरच दौंड तालुक्यातील अंतिम लढतींचे चित्र स्पष्ट होणार आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# स्वतःच्या चुकांवर काम करा; यश निश्चित मिळेल : ऑलिंपियन मुष्टीयोद्धा विजेंदर सिंह

**लोणी काळभोर, ता. २४ :** जीवनात अनेकदा गोष्टी आपल्याला हव्या तशा, मनाप्रमाणे होत नाहीत. कुठल्याही खेळाडूच्या आयुष्यात यश-अपयश ही न टाळता येणारी गोष्ट आहे. यशाने हरखून न जाणे आणि अपयशाने न खचणे हीच आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट खेळ आपल्याला शिकवतो. त्यामुळे कुठलाही खेळ निवडा, तो सातत्य, चिकाटी आणि स्वतःतील सर्वोत्तम देऊन खेळा. अपयशासाठी कोणालाही दोष न देता जबाबदारी घेऊन स्वतःच्या चुकांवर काम केल्यास, खेळ कुठलाही असो, यश निश्चित मिळतेच, असे मत ऑलिंपियन मुष्टीयोद्धा विजेंदर सिंह यांनी व्यक्त केले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे तर्फे आयोजित आठव्या विश्वनाथ स्पोर्ट मिट (व्हीएसएम२०२६) या वर्षातील सर्वांत मोठ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन/आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्थेचे (एनएसएनआयएस) उपमहासंचालक व वरिष्ठ कार्यकारी संचालक विनित कुमार, मेजर ध्यानचंद पुरस्कारप्राप्त बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे, विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., एव्हरेस्टवीर डॉ. सारा सफारी, अर्जुन पुरस्कारप्राप्त मुष्टीयोद्धा मनोज पिंगळे, प्र-कुलपती डॉ. रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुराज भोयार, क्रीडा संचालक प्रा. पद्माकर फड, स्पर्धेच्या सह-समन्वयक डॉ. प्रतिभा जगताप आदी उपस्थित होते.

विजेंदर सिंह पुढे बोलताना म्हणाले की, सध्या भारतात क्रीडा क्षेत्राचा सुवर्णकाळ सुरू आहे. पूर्वी पालक आपल्या पाल्याला अभ्यासाकडे लक्ष दे असे दडपण आणून सांगायचे; मात्र आता त्याला क्रीडा क्षेत्राकडे वळण्यास प्रोत्साहित केले जाते. अशा परिस्थितीत एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून एवढ्या मोठ्या स्तरावर क्रीडा स्पर्धेचे आयोजन होणे नक्कीच प्रेरणादायी आहे. विद्यापीठातील क्रीडा सुविधाही जागतिक दर्जाच्या असल्याचे कौतुक त्यांनी यावेळी केले.




प्रा. डॉ. सुनीता कराड यावेळी म्हणाल्या की, भारतातील क्रीडा संस्कृतीत वेगाने प्रगती होत आहे. सध्या आयोजित ग्रँड टूर सायकल स्पर्धेमुळे पुण्यातील वातावरण क्रीडामय झाले आहे.

भारतासह महाराष्ट्रात क्रीडा संस्कृती रुजवून ऑलिंपिक, राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धांसारख्या जागतिक स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंचा टक्का आणखी वाढला पाहिजे; यासाठी सरकार प्रयत्नशील आहेच. ग्रामीण तसेच शहरी भागातील खेळाडूंना आपली प्रतिभा दाखविण्यासाठी विद्यापीठ स्तरावरच एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न विश्वनाथ स्पोर्ट मिटच्या माध्यमातून केला जात आहे. त्याच उद्देशाने एमआयटी एडीटी विद्यापीठात जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

विश्वशांती प्रार्थना व स्पर्धेचा ध्वज फडकवल्यानंतर मॅनेट कॅडेटतर्फे प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, तर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा नियोजन समितीचे अध्यक्ष व कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस. यांनी केले, तर आभार प्रा. पद्माकर फड यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अशोक घुगे, डॉ. स्वप्निल शिरसाट आणि प्रा. स्नेहा वाघटकर यांनी केले.

## खेळाचा आनंद घ्यायला शिका : तृप्ती मुरगुंडे

एकविसाव्या शतकात खेळाची परिभाषा पूर्णपणे बदलली आहे. भारतातही उत्तम क्रीडा संस्कृती रुजली आहे. भारत सरकारच्या फिट इंडिया, खेलो इंडिया यांसारख्या कार्यक्रमांमुळे गेल्या काही वर्षांत अनेक खेळाडूंनी जागतिक पातळीवर पदके जिंकून भारताचा सन्मान वाढविला आहे. त्यामुळे कोणाच्या सांगण्यावरून क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेऊ नका. स्वतःला ओळखा, आत्मपरीक्षण करा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे खेळाचा आनंद घ्यायला शिका, असे बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे यांनी नमूद केले.

## यशासाठी सातत्य आवश्यक : विनित कुमार

विनित कुमार यावेळी म्हणाले की, महाविद्यालयीन जीवनात विविध स्पर्धांत आपले नैपुण्य दाखविल्यानंतर अनेक खेळाडू कुठेतरी मागे पडतात. त्यामुळे हार न मानता विद्यार्थ्यांनी खेळात सातत्य राखायला हवे. खेळातील सातत्य कायम ठेवण्यासाठी आणि खेळाडूंनी महाविद्यालयीन जीवनातच चांगले व्यासपीठ मिळवण्यासाठी व्हीएसएमसारख्या स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) प्रतिभावान खेळाडूंना व व्हीएसएम सारख्या स्पर्धांना कायमच प्रोत्साहन देत राहील, असेही ते म्हणाले.

## संक्षिप्त

### खेड तालुक्यातील एका तरुणाला मारहाण करुन विहिरीत ढकलले

**पुणे, ता. २४ :** खेड तालुक्यातील वडगाव घेनंद गावात बांधकामाच्या वादातून एका तरुणाच्या जिवावर बेतणारी घटना घडली आहे. शेतात सुरू असलेल्या कंपाउंडच्या कामावरून झालेल्या वादात एका व्यक्तीने तरुणाला मारहाण करून थेट विहिरीत ढकलल्याचा प्रकार समोर आला आहे. सुदैवाने नातेवाईकांनी वेळीच मदत केल्याने तरुणाचा जीव वाचला आहे. या प्रकरणी चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुण वय ३३ वर्षे असून त्याच्या शेतजमिनीत संरक्षणासाठी कँपाउंड उभारण्याचे काम सुरू होते. बुधवारी २१ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास आरोपी चारचाकी वाहनातून त्या ठिकाणी आला. कोणाच्या परवानगीने काम सुरू आहे, असा सवाल करत त्याने फिर्यादीशी वाद घालण्यास सुरुवात केली. सुरुवातीला शाब्दिक वाद झाला, मात्र काही वेळातच वातावरण तापले. वाद शांत करण्याचा प्रयत्न फिर्यादी करत असतानाच आरोपीने अचानक त्याला जोरात ढकलले. त्यानंतर लाकडी काठीने जबड्यावर जोरदार मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता आरोपीने जीवे मारण्याची धमकी देत तरुणाला शेजारी असलेल्या विहिरीत ढकलून दिले.

### बसच्या काचा फोडल्याने एकावर गुन्हा दाखल

**पुणे, ता. २४ :** पुण्याहून नंदुरबारकडे जाणाऱ्या एसटी बसवर भर रस्त्यात हल्ला झाला. गुरुवारी २२ जानेवारी रोजी सकाळी साडे७ ते पावणे ८च्या सुमारास पुणे-अहिल्यानगर महामार्गावर लोणीकंद परिसरात ही घटना घडली. एसटी चालक निशिकांत राठोड नंदुरबारकडे जाणारी बस चालवत असताना वाघोलीतील वाघेश्वर मंदिर चौकात एका टेम्पो चालकासोबत किरकोळ वाद झाला. गाडी आडवी का लावली असा आरोप करत टेम्पो चालकाने बस अडवली आणि आपल्या वाहनाचा आरसा तुटल्याचा दावा करत नुकसान भरपाईची मागणी केली. त्या वेळी वाद तिथेच थांबेल असे वाटत असतानाच, काही अंतरावर लोणीकंद येथे त्याच टेम्पो चालकाने पुन्हा बससमोर टेम्पो उभा करून रस्ता अडवला. येथे मात्र प्रकार हाताबाहेर गेला. टेम्पो चालकाने शिवीगाळ करत बसच्या आरशावर आणि काचांवर लोखंडी पाइपने वार केले. रस्त्याच्या कडेला पडलेले दगड उचलून त्याने बसच्या काचा फोडल्या. या गोंधळात एसटी चालकाचा मोबाईल फोनही फोडण्यात आला. बसमधील प्रवाशांमध्ये घबराट पसरली, काही काळ वाहतूकही खोळंबली. या प्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात आनंद विनोद पवार या तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### लाडक्या बहिणींच्या शंकाचे एका कॉलवर होणार निरासन

**मुंबई, ता. २४ :** लाडकी बहीण योजनेतील अनेक लाभार्थी महिलांना केवायसी करुनही त्यांच्या खात्यात नोव्हेंबर आणि डिसेंबरचे पैसे जमा झाले नाहीत. यावर आता राज्य सरकारने यावर तोडगा काढला आहे. महिलांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना दिल्या आहे. त्यानंतर आता आदिती तटकरेंनी मोठी घोषणा करत लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या सुविधेसाठी एक हेल्पलाइन नंबर जारी करण्यात आल्याचे सांगितले आहे. या योजनेशी संबंधित सर्व तक्रारींचे व शंकांचे निरसन १८१ या हेल्पलाईन नंबरवरून करण्यात येणार असून, सर्व लाडक्या बहिणींनी आवश्यकता भासल्यास या सुविधेचा लाभ घेण्याची विनंती आदिती तटकरेंनी ट्वीटद्वारे केली आहे.

# मेलो तरी चालेल, पण कधीही गुलामगिरी पत्करणार नाही : उद्धव ठाकरेंचा एल्गार

**मुंबई, ता. २४ :** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. त्यांचा वारसा घेऊन लढताना अंगावर येणाऱ्या वादळांची आम्हाला भीती नाही. सत्तेसाठी गद्दारांची मदत घेऊन महाराष्ट्र गिळू पाहणाऱ्या दोन व्यापाऱ्यांसमोर मेलो तरी चालेल, पण कधीही गुलामगिरी पत्करणार नाही, अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्यावर तोफ डागली.



मुंबईतील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म शताब्दी वर्षाचा सोहळा षण्मुखानंद सभागृहात पार पडला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मनसे नेते राज ठाकरेही त्यांच्यासोबत उपस्थित होते. याप्रसंगी ठाकरे बंधुंनी बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. उद्धव ठाकरे म्हणाले, ज्यांना स्वतःच्या वडिलांचे नाव घ्यायला लाज वाटते, त्यांच्याबद्दल मी काय बोलणार? छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून महाराष्ट्राला गद्दारीचा शाप लागलेला आहे. जेव्हा शत्रूला विजय अशक्य वाटतो, तेव्हाच तो गद्दारांची मदत घेतो.

जर ही गद्दारी भगव्याशी झाली नसती, तर आज महाराष्ट्राने जगाचा इतिहास बदलून दाखवला असता. आज आपलेच काही लोक दोन व्यापाऱ्यांच्या हातातले बाहुले बनून महाराष्ट्रावर घाव घालत आहेत, अशी टीका त्यांनी केली.मुंबई महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी शिवसैनिकांचे कौतुक केले. मुंबईची लढाई तुम्ही अत्यंत जिद्दीने लढलात. त्यामुळेच ठाकरे आणि शिवसेना नाव पुसून टाकण्याचे कारस्थान रचणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर मिळाले आहे.

मुंबईत निवडणुकीच्या काळात पैशांचा वारेमाप वापर झाला, बंद दाराखालून पाकिटे फेकली गेली. तुम्ही मते विकत घेऊ शकाल, पण लोकांची मने कधीच विकत घेऊ शकणार नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मुंबईवरचा भगवा उतरवून तुम्हाला नक्की काय मिळाले, असा सवालही त्यांनी विचारला.

पक्षातील फुटीवर बोलताना त्यांनी पानगळीचे उदाहरण दिले. झाडाची जुनी आणि सडलेली पाने गळणे गरजेचे असते. कारण ती गळल्याशिवाय नवे कोंब फुटत नाहीत. गेलेली माणसे ही विकली गेलेली पाने आहेत, ज्यांच्यात आता जीव उरलेला नाही. शिवसेवेला आता नवी पालवी फुटली असून नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. जोपर्यंत तुम्ही माझ्यासोबत आहात, तोपर्यंत मी पक्षप्रमुख आहे आणि आपण ही लढाई जिंकणारच, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पुणे शहर परिसरात एका सोसायटीत दिवसाढवळ्या घरफोडी

**पुणे, ता. २४ :** पुणे शहरातील सोमवार पेठ परिसरात दिवसाढवळ्या घरफोडीची धाडसी घटना घडली आहे. खडीचे मैदान परिसरातील एका सोसायटीत चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून मोठ्या प्रमाणात चोरी केली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे

सोमवार पेठेतील एका सोसायटीत राहणाऱ्या महिला मंगळवारी सकाळी सुमारे ११:१५ वाजता आपल्या घराला कुलूप लावून काही कामानिमित्त बाहेर गेल्या होत्या. घर भरवस्तीत असल्याने आणि परिसरात नेहमीच वर्दळ असल्यामुळे त्यांना कोणताही संशय आला नव्हता. मात्र दुपारी सुमारे २:४५ वाजता त्या घरी परतल्या असता, घराचे कुलूप तुटलेले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आत प्रवेश केल्यानंतर कपाट उघडलेले व अस्ताव्यस्त अवस्थेत असल्याचे दिसून आले.

तपासणी केली असता कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख १२ हजार ३३० रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याचे समोर आले. अवघ्या काही तासांत भरदिवसा झालेल्या या चोरीमुळे सोसायटीतील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच पीडित महिलेने समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, पुणे शहरातील फुरसुंगी परिसरातही चेन स्नॅचिंगची घटना घडली आहे. दुचाकीवरून घरी परतणाऱ्या एका तरुणाला पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवून, चोरट्यांनी त्याच्या गळ्यातील सुमारे १ लाख २२ हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी हिसकावून नेली.

# वाघोली परिसरात कौटुंबिक वादातून पतीनेच पत्नीला संपवलं

**पुणे, ता. २४ :** पुणे जिल्ह्यातील वाघोली परिसरात एक धक्कादायक घटना घडली असून, कौटुंबिक वादातून एका तरुण पतीने आपल्या पत्नीचा जीव घेतल्याचे समोर आले आहे. वाडेबोल्हाई परिसरात ही घटना घडली असून, अवघ्या १९ वर्षांच्या विवाहितेचा निर्घृण अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी पोलिसांनी पतीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.




मयत महिलेचे नाव नम्रता शैलेंद्र व्हटकर असे आहे. ती मूळची शिरसवडी परिसरातील रहिवासी होती. काही काळापूर्वी तिचा विवाह शैलेंद्र प्रकाश व्हटकर याच्याशी झाला होता. शैलेंद्र हा बकोरी येथील रहिवासी असून तो खासगी काम करत असल्याची माहिती आहे. लग्नानंतर काही महिन्यांपासून दोघांमध्ये सतत वाद होत असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नम्रता पतीकडे वारंवार सोन्याच्या दागिन्यांची मागणी करत होती. या कारणावरून घरात सतत भांडणे होत होती. या वादामुळे शैलेंद्र मानसिक तणावात होता. घटनेच्या दिवशी त्याने नम्रताला वाडेबोल्हाई परिसरातील एका निर्जन ठिकाणी भेटण्यासाठी बोलावले. तेथे दोघांमध्ये पुन्हा एकदा दागिन्यांच्या मुद्द्यावरून वाद झाला.

वाद वाढल्यानंतर रागाच्या भरात शैलेंद्रने सोबत आणलेल्या चाकूने नम्रतावर हल्ला केला. तिच्या गळ्यावर आणि चेहऱ्यावर वार केल्याने ती गंभीर जखमी झाली आणि तिचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणी लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून हत्येसाठी वापरलेले शस्त्र जप्त केले असून आरोपीची कसून चौकशी सुरू आहे. अल्पवयातच संसार सुरू झालेल्या नम्रताचा असा दुर्दैवी अंत झाल्याने कुटुंबीय आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोक व्यक्त केला जात आहे.

# मुंबई–पुणे महामार्गावरील अपघातात चार जण जखमी

**पुणे, ता. २४ :** देहू रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या किवळे परिसरात मुंबई-पुणे महामार्गावरील कात्रज-देहू रोड बायपासवर शुक्रवारी संध्याकाळी एक अपघात घडला. एका आलिशान मर्सिडीज कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून धडक दिली. या अपघातात कारमधील चार जण जखमी झाले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अपघातात मर्सिडीज कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास झाला. ट्रक महामार्गाच्या कडेला उभा होता, त्याच वेळी भरधाव वेगात आलेल्या मर्सिडीज कारने त्याला धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच देहू रोड पोलिस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तात्काळ उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मर्सिडीज चालकाने अपघात आपल्याच चुकीमुळे झाल्याचे मान्य केले आहे. सध्या या प्रकरणी कोणतीही तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. ट्रक चालकानेही आपल्या वाहनाचे विशेष नुकसान झाले नसल्याचे सांगितले असून त्यानेही तक्रार देण्यास नकार दिला आहे.

दरम्यान, या अपघाताचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये ट्रकवर निवडणूक साहित्य तातडीचे असे लिहिलेले दिसत असल्याने विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, पोलिसांनी या ट्रकमधील साहित्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.

# पुण्यात भाजप नगरसेविकेच्या भावावर जीवघेणा हल्ला

## किरकोळ वाद अन् १५ जणांची टोळी; राजकीय वर्तुळात खळबळ

**पुणे, ता. २४ :** पुण्यातील भवानी पेठ परिसरात बॅनर लावण्यावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूप हाणामारीत झाले. या घटनेत भारतीय जनता पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेविका मृणाल कांबळे यांच्या भावाला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी खडक पोलिसांनी १४ ते १५ जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंतनू पांडुरंग कांबळे उर्फ बापू कांबळे (वय ३०, रा. एसआरए कॉलनी, लोहियानगर, महात्मा फुले पेठ) यांनी खडक पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. गुरुवारी २२ जानेवारी रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास काशेवाडी परिसरात हा प्रकार घडला. नगरसेवकपदाच्या निवडणुकीत मिळालेल्या विजयानंतर मृणाल कांबळे यांच्या समर्थकांकडून मतदारांचे आभार मानण्यासाठी बॅनर लावण्याचे काम सुरू होते.

याच वेळी त्याच प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेविका अर्चना पाटील यांचे पती तुषार पाटील यांचे समर्थक तेथे पोहोचले. त्यांनी त्या ठिकाणी बॅनर लावू नयेत, असे शंतनू कांबळे यांना सांगितले. यावरून वाद झाला आणि काही वेळातच हा वाद चिघळत गेला. जमावाने शंतनू कांबळे यांच्यावर लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच पुन्हा त्या भागात बॅनर लावल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हर्षल कदम करत आहेत. संबंधित परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, मृणाल कांबळे यांनी प्रभागक्रमांक २२मधील काशेवाडी-डाइस प्लॉट परिसरातील अ जागेतून विजय मिळवला आहे, तर अर्चना पाटील यांनी त्याच प्रभागातील क जागेतून विजय संपादन केला आहे. या घटनेमुळे भवानी पेठ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी परिसरात बंदोबस्त वाढवला आहे.

# जेजुरी रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी

**जेजुरी, ता. २४ :** राज्यातील महत्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जेजुरी रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांना थांबा देण्यात यावा, तसेच स्थानकाचा सर्वांगीण विकास करण्यात यावा, या मागणीसाठी जेजुरीतील सामाजिक कार्यकर्ते, रेल्वे प्रवासी संघटना आणि लोकप्रतिनिधी आक्रमक झाले आहेत.

रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे, भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक अविनाश डोंबे आणि ग्रामस्थ यांनी जेजुरी रेल्वे स्थानकाची पाहणी केली आणि भाविक, प्रवासी आणि पर्यटकांशी संवाद साधला. यानंतर रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले. या निवेदनानुसार जेजुरी रेल्वे स्थानक सर्व मूलभूत सोयीसुविधांनी सुसज्ज करावे आणि लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांना थांबा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.

जेजुरी हे केवळ तीर्थक्षेत्रापुरते मर्यादित नसून, औद्योगिक वसाहत, प्रस्तावित आयटी हब, विमानतळ आणि मेट्रो प्रकल्पामुळे भविष्यातील महत्वाचे केंद्र ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. मात्र वाढत्या भाविक व पर्यटकांच्या तुलनेत जेजुरी रेल्वे स्थानकाचा विकास अत्यंत अपुरा असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.




स्थानकावरील प्रतीक्षा कक्ष बहुतेक वेळा बंद असतो. स्वच्छतागृहांची कमतरता, पिण्याच्या पाण्याची गैरसोय आणि अस्वच्छ परिसरामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची नाराजी मुंबईहून आलेल्या महिला भाविकांनी व्यक्त केली. केंद्र सरकारकडून रेल्वेचे वेगाने आधुनिकीकरण सुरू असताना जेजुरी रेल्वे स्थानकाचा अमृत भारत स्टेशन योजनेत समावेश न होणे ही दुर्दैवी बाब असल्याचेही यावेळी निवेदन कर्त्यांनी सांगितले.

जेजुरी येथे दरवर्षी आठ ते नऊ यात्रा भरतात. या काळात आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक जेजुरीत येतात. मात्र महालक्ष्मी, सह्याद्री, गोवा-हुबळी, गुजरात-राजस्थान मार्गे दिल्लीकडे जाणाऱ्या कोणत्याही लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांना जेजुरी येथे थांबा नसल्यामुळे भाविक, पर्यटक, उद्योजक आणि कामगार वर्गाला पुणे, सातारा किंवा कराड येथे उतरून पुढील प्रवास करावा लागतो. जेजुरी रेल्वे स्थानकाच्या आसपास मोरगाव, नारायणपूर, भुलेश्वर, पांडेश्वर, वीर म्हस्कोबा, सासवड येथील शिवमंदिरे, बालाजी मंदिर तसेच किल्ले पुरंदर ही प्रमुख धार्मिक व पर्यटनस्थळे असून सध्या त्यांचा मोठ्या प्रमाणावर विकास सुरू आहे. या पार्श्वभूमीवर जेजुरी रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांना थांबा देणे अत्यावश्यक असल्याचे मत सर्व उपस्थितांनी व्यक्त केले.

पुणे प्राईम न्यूज
जनमानसाचा निडर आवाज...
http://www.puneprimenews.com

# लोणी काळभोर, उरुळी कांचन, कोरेगाव मूळ सह थेऊर गटात बहुरंगी लढत

## बंडखोरी कोणाला मारक? छाननीनंतर वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी

**लोणी काळभोर, ता. २४:** लोणी काळभोर, उरुळी कांचन, कोरेगाव मूळ तसेच थेऊर जिल्हा परिषद गटात निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू झाली आहे. चारही गटांमध्ये यंदा बहुरंगी व चुरशीची लढत पाहायला मिळणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. विविध पक्षांसह अपक्ष उमेदवारांनी निवडणूक लढविण्यासाठी निवडणूक आयोगाकडे उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

या अर्जांची गुरुवारी (ता. २२) छाननी प्रक्रिया पार पडली. छाननीअंती वैध ठरलेल्या उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर करण्यात आली असून, या यादीमुळे निवडणूक चित्र अधिक स्पष्ट झाले आहे. अनेक प्रस्थापित नेत्यांसह नव्या चेहऱ्यांचा देखील निवडणूक रिंगणात प्रवेश झाल्याने मतदारांमध्ये उत्सुकता वाढली आहे. छाननीनंतर वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची गटनिहाय यादी पुढील प्रमाणे आहे.

लोणी काळभोर जिल्हा परिषद गट (कदमवाकवस्ती व लोणी काळभोर गण) : १)भाजप : पूनम बाबुराव गायकवाड, ज्ञानेश्वर नाम ुगडे, श्वेता काळभोर, २)राष्ट्रवादी : शीतल कांबळे, अमोल टेकाळे, रेश्मा काळभोर, ३) शिवसेना : सिंपल गणेश कांबळे, विजय भागवत दाभाडे (अपक्ष) नंदिनी कोळपे, ४) अपक्ष (जिल्हा परिषद गट) : नीता संजय आवारे (बसपा), कलावती अश्रुबा धेले (शिवसेना उबाठा), रुपाली अविनाश कोरे, अनिता सुर्यकांत गवळी, स्वाती गणेश थोरात, ५) अपक्ष (कदमवाकवस्ती गण ) : रुपाली अविनाश कोरे, दिलीप विठ्ठलराव गायकवाड, राहुल प्रकाश जोगदंड, भारत मोहन पिसाळ, अक्षय रमेश म्हस्के, नितेश अंबादास लोखंडे, नकुल राजाभाऊ शिंदे,प्रकाश नारायण भिसे, ६)अपक्ष (लोणी काळभोर गण ) : विद्या दत्तात्रय गायकवाड,

थेऊर जिल्हा परिषद गट (आव्हाळवाडी, थेऊर गण) : १) भाजप : पुष्पलता प्रकाश सावंत, पूनम अशोक गायकवाड, योगेश दत्तात्रय काकडे, २)राष्ट्रवादी : कोमल संदेश आव्हाळे, सुष्मा संतोष मुरकुटे, युवराज हिरामण काकडे,३) अपक्ष (जिल्हा परिषद गट) : पल्लवी युवराज गायकवाड, कोमल पंकज आवाळे, ऋतुजा प्रकाश सावंत,४) अपक्ष (आव्हाळवाडी गण ) : मीना सतीश आव्हाळे, दिपाली विकास कांचन, जयश्री उमेश गायकवाड,५) अपक्ष (थेऊर गण ) : संग्राम मच्छिंद्र कोतवाल, सिद्धांत सचिन तुपे, प्रकाश दत्तात्रय घुले

कोरेगाव मूळ-केसनंद गट (कोरेगाव मूळ-केसनंद) : १)भाजप : कविता विजय पायगुडे, सूरज चौधरी, कुशाल सातव, २)राष्ट्रवादी : सुरेखा रमेश हरगुडे, कृषिराज उर्फ मनोज दत्तात्रय चौधरी, प्रमोद हरगुडे, ३) अपक्ष (जिल्हा परिषद गट ) : सुरेखा शिवाजी भोरडे (राष्ट्रवादी शरद पवार गट), दिलापी केतन निकाळजे (वंचित), नलिनी बाळासो गावडे, प्रियांका संदीप जगताप, सायली पराग वाबळे, हर्षदा कुशल सातव, तेजश्री तानाजी हरगुडे, प्रियांका प्रकाश हरगुडे, ४) अपक्ष (कोरेगाव मूळ गण ) : गणेश बाळासाहेब चौधरी, राजेंद्र ज्ञानोबा चौधरी, प्रीतम चंद्रकांत शिरोळे,५) अपक्ष ( गण केसनंद) : धर्मेंद्र महादेव गावडे (मनसे), प्रशांत माणिक कोतवाल, विशाल बंडू कोतवाल, सोमनाथ माणिक कोतवाल, चंद्रशेखर ज्ञानेश्वर घाडगे, विजय प्रभाकर पायगुडे, निलेश सुभाष मोरे, हर्षदा कुशल सातव, विश्वास रंगनाथ शितोळे, दत्तात्रय मारुती हरगुडे, सोमनाथ बाळासाहेब हरगुडे,

उरुळी कांचन जिल्हा परिषद गट (सोरतापवाडी व उरुळी कांचन गण) : १)भाजप : शंकर बडेकर,सुदर्शन चौधरी, सारिका लोणारी, २) राष्ट्रवादी : जितेंद्र बडेकर, आण्णा महाडिक, कोमल कांबळे, ३) शिवसेना उबाठा : अनिल रामू कदम, संजय महादेव कुंजीर, ४) अपक्ष (जिल्हा परिषद गट ) : बाळासाहेब केशव बडेकर (वंचित), भाऊसाहेब राजाराम शिंदे (राष्ट्रीय समाज पक्ष), महादेव शंकर कांबळे, सदाशिव रमेश कांबळे, जीवन शिंदे, योगेश नारायण सातपुते, ५) अपक्ष (सोरतापवाडी गण ): पूजा सणस, प्रवीण मारुती कुंजीर, गणेश भाऊसाहेब महाडिक, मनीषा आण्णा महाडिक ६) अपक्ष (उरुळी कांचन गण) : अश्विनी प्रवीण बडेकर (अखिल भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस), आरती निलेश शेलार (राष्ट्रीय समाज पक्ष), बेबी अशोक कसबे, सुषमा आबासाहेब चौधरी, अश्विनी समाधान तुपेरे.

दरम्यान, वरिष्ठ नेत्यांकडून नाराजांची मनधरणी सुरू असून, २७ जानेवारीपर्यंत अनेक उमेदवार अर्ज मागे घेतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, काही बंडखोर शेवटपर्यंत निवडणूक रिंगणात राहिल्यास त्याचा सर्वाधिक फटका सत्ताधारी व मोठ्या पक्षांनाच बसण्याची दाट शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

### बंडखोरी कोणाला मारक?

लोणी काळभोर, उरुळी कांचन, कोरेगाव मूळ तसेच थेऊर गटात काही पक्षांमध्ये अंतर्गत नाराजी उफाळून येताना दिसत आहे. इच्छुक उमेदवारांना तिकीट न मिळाल्याने बंडखोरीचे राजकारण वाढण्याची चिन्हे आहेत. या बंडखोरीचा थेट फटका संबंधित पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला बसण्याची शक्यता आहे.विशेषतः ज्या गटांमध्ये दोन ते तीन मजबूत उमेदवार एकाच पक्षात इच्छुक होते, त्या ठिकाणी अपक्ष उमेदवारांच्या उमेदवारीमुळे मतांचे विभाजन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याचा फायदा विरोधी पक्षांना होऊ शकतो. मागील निवडणुकांमध्येही अशा प्रकारच्या बंडखोरीमुळे काही गटांमध्ये निकाल शेवटच्या क्षणी पलटले होते.

# पुण्यात जुन्या वादातून तरुणाचा खून ; आरोपीला अटक

**पुणे, ता. २४ :** जुन्या वादाचा जाब विचारण्यासाठी गेलेला तरुण पुन्हा घरी परतलाच नाही. खेड तालुक्यातील येळवाडी येथे गुरुवारी २२ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या हिंसक घटनेत ३२ वर्षीय तरुणाचा चाकूने वार करून खून करण्यात आला, तर त्याचा एक मित्र गंभीर जखमी झाला. किरकोळ भांडणातून सुरू झालेला वाद थेट जीवघेण्या टोकाला पोहोचल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.




योगेश धाकतोडे असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो आपल्या मित्रांसोबत काही दिवसांपूर्वी झालेल्या भांडणाबाबत जाब विचारण्यासाठी आरोपीच्या घरी गेला होता. पोलिस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, सुरुवातीला दोन्ही बाजूंमध्ये वाद मिटवण्याचा प्रयत्न सुरू होता. मात्र बोलणं वाढत गेलं तसे वातावरण तापत गेलं. याच दरम्यान आरोपी अमोल पोपट वाघ याने अचानक चाकू काढत योगेशच्या बरगडीजवळ जोरदार वार केला. गंभीर जखमी झालेल्या योगेशचा जागीच मृत्यू झाला. मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणखी एका तरुणावरही चाकूने वार करण्यात आला असून तो जखमी अवस्थेत उपचार घेत आहे.

या घटनेनंतर परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं. माहिती मिळताच म्हाळुंगे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी तरुणाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं, तर योगेशचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. या प्रकरणी योगेशचा भाऊ महेश विलास धाकतोडे, वय २९, रा. हिंजवडी, यांनी म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी तातडीची कारवाई करत अमोल पोपट वाघ, वय ३०, रा. येळवाडी, ता. खेड, याला अटक केली आहे. प्राथमिक तपासात जुन्या वादातूनच ही घटना घडल्याचं स्पष्ट होत आहे. क्षुल्लक भांडणं थेट हत्येपर्यंत कशी जात आहेत, हा प्रश्न पुन्हा एकदा या घटनेमुळे ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, आरोपीविरोधात कठोर कारवाई केली जाणार असल्याचं सांगण्यात आलं आहे.

# मुंबई महापौर पदाची निवड लांबणीवर पडणार ?

**मुंबई, ता. २४ :** मुंबई महापालिकेचा महापौर कोण होणार याबाबत मोठी उत्सुकता आहे. २२ जानेवारीला मुंबई महापालिकेच्या महापौर पदाची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. या सोडतीत हे पद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव झाले आहे. त्यानंतर भाजपकडून महापौर पदासाठी अनेक नावे आघाडीवर आहेत. या सगळ्यात आता महापौर पदाची निवड लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पालिकेच्या निवडणुकीनंतर २७ जानेवारी रोजी महापौरपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार होते. मात्र, भाजप आणि शिवसेना युतीबाबत एकत्रित गट स्थापन होणार की नाही याबाबत स्पष्टता नाही. यासोबतच पक्षाची गटनोंदणी पूर्ण झालेली नाही. या सगळ्या गोष्टी लक्षात घेता महापौर पदाची निवड फेब्रुवारी महिन्यात होणार असल्याची शक्यता आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळाले. ८९ जागांवर भाजपने विजय मिळवला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला केवळ २९ जागांवर विजय मिळवता आला. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी हॉटेल पॉलिटिक्सची रणनिती आखली. ज्याची बरीच चर्चा राजकीय वर्तुळात झाली. एकनाथ शिंदेंनी महापौर पदावर दावा केला असल्याची चर्चा झाली. यासोबतच स्थायी समिती अध्यक्षपदावर दावा केला आहे. या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिवसेना शिंदे यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू आहे. अंतर्गत चर्चा आणि वाद मिटल्याशिवाय स्पष्टता येणे अवघड आहे. त्यामुळे पक्षातील बड्या नेत्यांकडून तोडगा काढण्यावर भर दिला जात असल्याची माहिती आहे.

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गवर कोंडी

**पुणे, ता. २४ :** मुंबईपुणे द्रुतगती महामार्ग आणि जुन्या मुंबईपुणे महामार्गावर शनिवारी सकाळपासून निर्माण झालेली वाहतूक कोंडी ही अचानक घडलेली घटना नसून, सुट्ट्यांच्या नियोजनाविना वाढणाऱ्या प्रवासाचे नेहमीचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. सलग तीन दिवसांची सुट्टी, वीकेंड आणि पुणे तसेच पुढील पर्यटनस्थळांकडे जाण्याचा वाढलेला ओघ यामुळे पहाटेपासूनच दोन्ही महामार्गांवर वाहनांची संख्या झपाट्याने वाढली.



खोपोली ते बोर घाट या संपूर्ण पट्ट्यात वाहनांची रांग अनेक किलोमीटरपर्यंत पसरली असून, खोपोली आणि खंडाळा घाटात परिस्थिती सर्वाधिक गंभीर आहे. द्रुतगती महामार्गावर मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या लेनवर जवळपास ६ ते ७ किलोमीटरपर्यंत वाहने अक्षरशः रांगत असल्याचे चित्र आहे. अनेक प्रवासी नियोजित वेळेपेक्षा २ ते ३ तास उशिरा पोहोचत असून, लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक आणि खासगी वाहनचालकांचा संयम सुटताना दिसत आहे.

या कोंडीमागे केवळ प्रवाशांची संख्या हेच कारण नाही. अवजड वाहनांनी लेनशिस्त न पाळणे, घाटात अचानक थांबणारी वाहने आणि काही ठिकाणी रस्त्याच्या क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक हे घटकही परिस्थिती बिघडवणारे ठरले आहेत. द्रुतगती महामार्ग हा वेळ वाचवण्यासाठी बनवला असला, तरी सुट्ट्यांच्या काळात तोच महामार्ग तासन्तास अडकल्याचे चित्र वारंवार दिसते. रायगड, पुणे आणि महामार्ग वाहतूक पोलिस संयुक्तपणे कोंडी सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काही ठिकाणी अवजड वाहनांना रोखणे, वाहतूक वळवणे आणि घाटातील प्रवाह सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. मात्र, प्रवाशांनीही प्रवासाला निघताना वेळेचे नियोजन, शक्य असल्यास गर्दीची वेळ टाळणे आणि लेनशिस्त पाळणे आवश्यक आहे. अन्यथा प्रत्येक सुट्टीत मुंबईपुणे प्रवास हा आरामदायी नव्हे, तर त्रासदायकच ठरणार आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# शेवटच्या क्षणी भाजपकडून दगाबाजी; आमच्या सोबत जो घात केलाय त्याचा हिशोब करणार : अजिंक्य कांचन

**उरुळी कांचन, ता. २४ :** उरुळी कांचन जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणातून भारतीय जनता पार्टीकडून जाहीर करण्यात आलेले उमेदवार चुकीचे तसेच परस्परविरोधी आहेत. आमच्यासोबत शेवटच्या क्षणी भाजपकडून दगाबाजी करण्यात आली. त्यामुळे आमच्या सोबत जो घात केलाय त्याचा हिशोब नक्की करणार असल्याचे मत भाजपा नेते अजिंक्य कांचन यांनी केले आहे.

उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील श्रीकृष्ण मंगल कार्यालयात शुक्रवारी (ता. २३) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास जाहीर निषेध या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या निषेधार्थ उरुळी कांचन जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत जोरदार निषेध व्यक्त केला. यावेळी अजिंक्य कांचन बोलत होते.

यावेळी या मेळाव्याला अजिंक्य कांचन, श्रीकांत कांचन, जिवन शिंदे, सारिका लोणारी, पूजा सणस, अमित कांचन, अक्षय कांचन, ओंकार कांचन, संजय कांचन, बाळा तुपे, सुनिल तुपे, रेखा तुपे, मच्छींद्र कड, प्रसन्न भोर, युवराज जरड, शंकर जरड, काळूराम कुरकुंडे, तसेच आरएसएस संघातले व संलग्न संघटनेतले पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यापुढे बोलताना भाजप युवा नेते अजिंक्य कांचन म्हणाले की, गेले अनेक वर्ष आम्ही एक एक कार्यकर्ता जोडला कुठल्याही पदाची अपेक्षा न करता आम्ही भाजपचे काम करत आलोय. आम्हाला वरिष्ठ नेत्यांकडून ही जागा लढण्यासाठी व उमेदवार देण्यासाठी सांगण्यात आले. त्यादृष्टीने आम्ही जिल्हा परिषद साठी जिवन



महाराज शिंदे यांना तयारी करण्यास सांगितली तसेच उरुळी कांचन पंचायत समितीसाठी उमेदवार निवडीची बैठक झाली असता कोणीही लढण्यास तयार नसल्याने पूजा सणस यांना तयारी करण्यास सांगितले.

यादृष्टीने गेले अनेक महीने दोन्ही उमेदवारांनी चांगली तयारी केली. असे असताना एबी फॉर्म आम्हाला देऊन त्यानंतर पुन्हा दुसऱ्याला एबी फॉर्म देऊन शेवटच्या क्षणी आमचा घात करण्यात आला. आम्हाला फसवून ही उमेदवारी देण्यात आली, जर उमेदवारी द्यायची नव्हती तर आम्हाला तसे सांगितले असले तर आम्ही स्वतःहून माघार घेतली असती. आता शेवटच्या क्षणी तुम्ही दुसऱ्याचे लेकरू आमचा कडेवर देऊन, हे तुमचे लेकरू आहे म्हणाल पण आम्ही कस आमचं म्हणू? दगाबाजी आमच्या रक्तात नाही पण ही दगाबाजी आमची का करण्यात आली? ज्यांनी कोणी हे घडवलं त्या सगळ्याचा हिशोब केल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

### शिंदे व सणस यांना उमेदवारी जाहिर करा

आम्हाला फक्त २ पंचायत समिती उमेदवारांची काम करा असे वरिष्ठांकडून सांगण्यात येतय म्हणजे तुम्ही आयात केलेल्या जिल्हा परिषद उमेदवारांसोबत सुद्धा घात करत आहात? पूजाने तर इतके काम केले असताना त्यांना उमेदवारी का नाकारण्यात आली? जे आता काल पक्षात आले ते ५ फेब्रुवारी नंतर पक्षात दिसणार नाही, त्यामुळेच अजूनही वेळ गेलेली नाही जीवन शिंदे यांना जिल्हा परिषदेची आणि पूजा सणस यांना पंचायत समितीची उमेदवारी जाहिर करा. आम्हाला कुठलाही चुकीचा निर्णय घेण्यास पक्ष नेतृत्वाने भाग पाडू नये.

श्रीकांत कांचन म्हणाले, भारतीय जनता पार्टीची उरुळी कांचन मधील वाटचाल माजी जिल्हाध्यक्ष नामदेव बापू ताकवणे यांनी २०१३ साली गावात पदाधिकारी निवडीसाठी व पक्षात काम करण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांसाठी मुलाखती ठेवल्या होत्या. त्यासाठी गावामध्ये बोर्ड लावण्यात आला होता. त्यावेळी एक सुद्धा माणूस या पक्षात काम करण्यास तयार नव्हता. या मुलाखतींना कोणीही आले नव्हते; अशा स्थितीत आम्ही सर्वजण मिळुन, काही संघातले पदाधिकारी, काही विद्यार्थी परिषदेतले पदाधिकारी यांनी मिळून भारतीय जनता पार्टीचे काम सुरू केलं आणि आज भारतीय जनता पार्टीचे काम येथे पोहोचवले. आम्ही उभी केलेल्या पार्टीचे काही संधी साधू लोकांनी दुकानदारी करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि ते आम्ही होऊन देणार नाही

दरम्यान, या मेळाव्याला अनेकांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. यावेळी सर्वानुमते उरुळी कांचन जिल्हापरिषद गटातील व उरुळी कांचन-सोरतापवाडी पंचायत समिती गणातील उमेदवार बदलण्यात यावा असा सर्वानुमते ठराव करण्यात आला.

प्राईम लाईफ



## दिवसभर उर्जावान राहण्यासाठी आपल्या आहारात कोणती फळे समाविष्ट करायला हवीत

आपण दिवसाची सुरुवात नाष्ट्याने करतो. परंतु काहीजणांना मात्र नाष्टा खायला खूप कंटाळा येतो. अशावेळी दिवसाची सुरुवात कशी आणि काय खाऊन करावी याकडेही लक्ष देणे महत्त्वाचे आहे. दिवसभर उर्जावान राहण्यासाठी आपल्या आहारांमध्ये या फळांचा समावेश करणे खूप गरजेचे आहे.

सफरचंद खाणे हृदयासाठी किती फायदेशीर आहे हे सर्वांनाच माहिती आहे. त्याचबरोबर सफरचंदाचे सेवन ऊर्जा देण्याचे काम देखील करते. उपवास करत असाल आणि खूप काम करत असाल तर, दिवसभर उर्जावान राहण्यासाठी किमान एक सफरचंद हे खायलाच हवे.

केळी हे असे फळ आहे जे खाल्ल्यानंतर पोट भरलेले वाटते आणि अशक्तपणा येत नाही. म्हणून उपवास करत असाल तर, कामाच्या दरम्यान किंवा सकाळी एक किंवा दोन केळी खा.

व्हिटॅमिन सी आणि पाण्याने समृद्ध संत्री शरीराला हायड्रेट ठेवते आणि ऊर्जा देखील देते. याशिवाय स्ट्रॉबेरी, द्राक्षे, किवी सारखी लिंबूवर्गीय फळे देखील त्वरित ऊर्जा वाढवण्यास मदत करतात.

उपवास करत असाल तर फळांव्यतिरिक्त तुम्ही खजूर खाऊ शकता. सकाळी खजूर खाल्ले तर ते भरपूर ऊर्जा देईल. याशिवाय बदाम, अक्रोड, मनुका, अंजीर यांसारखे कोरडे फळे रात्रभर भिजत घाला आणि सकाळी खा. तुम्हाला भरपूर ऊर्जा मिळेल. याशिवाय पाणी पिण्याकडे लक्ष द्या.



## कोणाच्या दबावाला मी भीक घालत नाही : रुपाली ठोंबरे

**पुणे, ता. २४ :** महापालिका निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान निर्माण झालेल्या वादामुळे पुण्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापलं आहे. मतमोजणी प्रक्रियेत गोंधळ घालून शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याच्या आरोपावरून रुपाली ठोंबरे पाटील यांच्यासह काही उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींवर विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाल्याने हा प्रकार केवळ पोलिस कारवाईपुरता मर्यादित न राहता राजकीय चर्चेचा मुद्दा ठरला आहे.

ही घटना १६ जानेवारी रोजी दुपारी सुमारे १२ वाजता टिळक रोडवरील न्यू इंग्लिश स्कूल येथील मतमोजणी केंद्रात घडली. कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयातील उपअभियंता सुधीर आलुरकर यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, मतमोजणी सुरू असताना रुपाली ठोंबरे पाटील यांनी त्यांच्या हरकत अर्जाची पोच देण्यात यावी, अशी मागणी करत मतमोजणी केंद्रात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. सुरक्षेच्या कारणास्तव केंद्राभोवती उभारण्यात आलेल्या सुरक्षा जाळीवर त्या चढल्याचा आणि आरडाओरड केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मतमोजणी प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला, तसेच केंद्रातील वातावरण तणावपूर्ण झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यांच्यासोबत असलेल्या इतर काही उमेदवार आणि प्रतिनिधींनीही गोंधळ घालून परिस्थिती चिघळवल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शासकीय कामकाजात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, रुपाली ठोंबरे पाटील यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसिद्ध करत आरोप फेटाळले आहेत. आपल्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा दावा करत त्यांनी, निवडणुकीनंतर आपण कोणतेही गैरकृत्य केलेले नसल्याचे सांगितले आहे. अशा गुन्ह्यांना आपण घाबरत नसून, पोलिस आणि निवडणूक यंत्रणेने आत्मपरीक्षण करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. कोणाच्या दबावाखाली ही कारवाई झाली असेल तर त्याला आपण भीक घालत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## २०० पेक्षा जास्त धावांच्या पाठलागात भारताचा दबदबा; सहाव्यांदा केला पराक्रम

**मुंबई, ता. २४ :** भारत-न्यूझीलंड यांच्यातील दुसऱ्या टी-२० सामन्यात टीम इंडियाने केवळ सामना जिंकला नाही, तर जागतिक टी-२० क्रिकेटचा इतिहासच बदलून टाकला. २०९ धावांचे आव्हान अवघ्या २८ चेंडू शिल्लक असताना पूर्ण करत भारताने टी-२० क्रिकेटमधील २००+ धावांचा सर्वात वेगवान आणि प्रभावी पाठलाग केला. असा पराक्रम करणारा भारत हा जगातील पहिला संघ ठरला आहे.

या सामन्याची पार्श्वभूमी पाहिली तर, न्यूझीलंडने फलंदाजी करताना मोठी धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच लगाम घातला. कुलदीप यादवने अचूक चायनामन



गोलंदाजी करत दोन महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या, तर हार्दिक पंड्या, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी एक विकेट काढत न्यूझीलंडला २३० च्या आसपास जाण्यापासून रोखले. यामुळे भारतासमोर जिंकण्याजोगं लक्ष्य राहिलं.

खरी कहाणी मात्र भारतीय फलंदाजीत घडली. कर्णधार सूर्यकुमार यादवने टीकेला सडेतोड उत्तर देत धमाकेदार अर्धशतक झळकावले. त्याच्या आक्रमक खेळीमुळे संघावरचा दबाव क्षणात नाहीसा झाला. पॉवरप्लेपासूनच भारताने सामन्यावर वर्चस्व मिळवलं आणि धावांचा पाठलाग औपचारिकता ठरला.

हा विजय का महत्त्वाचा आहे? कारण भारताने पुन्हा एकदा दाखवून दिलं की आधुनिक टी-२० क्रिकेटमध्ये मोठ्या लक्ष्यांचा पाठलाग ही त्यांची ताकद आहे. आतापर्यंत भारताने सहा वेळा २०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पार केले असून या यादीत तो आता ऑस्ट्रेलियानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलियाने अलीकडे असे पराक्रम केले असले, तरी २८ चेंडू शिल्लक ठेवून केलेला हा विजय अभूतपूर्व आहे.

हा सामना केवळ एक विजय नाही, तर भारतीय टी-२० संघाच्या आक्रमक मानसिकतेचा, खोलीचा आणि आत्मविश्वासाचा ठोस पुरावा आहे. आगामी जागतिक स्पर्धांच्या दृष्टीने हा इशारा पुरेसा आहे-भारत थांबलेला नाही, तो अधिक धोकादायक होत चालला आहे.

## पुण्यात पत्ता विचारण्याच्या बहाण्याने तरुणाला लुटले

**पुणे, ता. २४ :** पुणे शहरातील फुरसुंगी परिसरात चेन स्नॅचिंगची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुचाकीवरून घरी जात असलेल्या एका तरुणाला पत्ता विचारण्याच्या बहाण्याने अडवून चोरट्यांनी त्याच्या गळ्यातील सोन्याची साखळी हिसकावून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेत सुमारे १ लाख २२ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन चोरीला गेली असून याप्रकरणी फुरसुंगी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भेकराई नगर परिसरात राहणारा २७ वर्षांचा तरुण एका खासगी कंपनीत नोकरी करतो. २१ जानेवारी रोजी रात्री काम आटोपून तो दुचाकीवरून सासवड रोडने घरी निघाला होता. फुरसुंगी येथील एनआयबीएम परिसरात आल्यानंतर पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोन तरुणांनी त्याला थांबण्याचा इशारा केला. सुरुवातीला त्यांनी पत्ता विचारण्याचा बहाणा करत त्याच्याशी संवाद साधला.

बोलण्यात गुंतवून अचानक चोरट्यांनी तरुणाच्या गळ्यातील सोन्याच्या साखळीवर झडप घातली आणि ती हिसकावून वेगाने पळ काढला. ही घटना इतक्या अचानक घडली की तरुणाला काही क्षण काहीच समजले नाही. त्याने आरडाओरड केली, मात्र तोपर्यंत चोरटे दूर निघून गेले होते. घटनेनंतर पीडित तरुणाने तातडीने फुरसुंगी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

## 'ई-केवायसी' नंतरही लाडक्या बहिणी लाभापासून वंचित

**मुंबई, ता. २४ :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी केल्यानंतरही गेल्या दोन महिन्यांपासून लाडक्या बहिणींना दरमहा दीड हजार रुपयांचा लाभ मिळालाच नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या तक्रारी महिला व बालकल्याणमंत्री अदिती तटकरे यांच्यापर्यंत पोहोचल्याने त्यांनी अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणीचे आदेश दिले आहेत. मात्र, हा आदेश अद्याप महिला बालकल्याण अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचलाच नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य सरकारने गेल्या वर्षी लाडक्या बहिणी योजनेचा अनावश्यक लाभ घेणाऱ्या महिलांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार चारचाकी असणाऱ्या महिलांची पडताळणी करण्यात आली. त्यातून राज्यभरातून अनेक महिला लाभार्थ्यांना अपात्र ठरवून त्यांना अनुदान बंद करण्यात आले. पडताळणीचा दुसरा टप्पा म्हणून ई-केवायसी बंधनकारक करण्यात आले. ई-केवायसी करताना ओटीपी येत नसल्याचे आढळले. त्यावर घटस्फोट अथवा पती किंवा पिता निधनाचे प्रमाणपत्र जोडण्याची सक्ती करण्यात आली आहे. दोन महिन्यांपासून लाभ नाही

आता ई-केवायसी केल्यानंतरही पुणे जिल्ह्यासह राज्यातील अनेक लाडक्या बहिणींना दोन महिन्यांपासून योजनेचा लाभ मिळालेला नाही. अनेक महिलांनी याबाबत महिला बालकल्याण विभागासह स्थानिक पंचायत समिती, नगरपालिकेकडे तक्रारी केल्या आहेत. काही महिलांकडे चारचाकी असूनही त्या महिलांना पुन्हा अनुदान सुरू केल्याचेही दिसले. शेजारीच राहणाऱ्या महिलेने ई-केवायसी करूनही आणि चारचाकीसह अन्य लाभ सुरू असूनही त्यांना लाभापासून वंचित ठेवले आहे, अशा तक्रारी महिलांनी केल्या.

दुसरीकडे ज्यांनी ई-केवायसी केले नाही, अशा महिला लाडक्या बहिणी ठरल्या असून, त्यांना लाभ मिळाला आहे. प्रामुख्याने अनेक ठिकाणी पात्र, अपात्र लाभार्थ्यांची यादीच जाहीर होत नसल्याने योजनेच्या लाभाबाबत लाडक्या बहिणींसह भावांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. पात्र, अपात्र लाभार्थ्यांची यादी वेबसाइटवर जाहीर करण्याची मागणी केली आहे. एकाच कुटुंबातील एकच लाभार्थी असूनही ई-केवायसी केले आहे. उत्पन्न अडीच लाखांच्या आत असून, चारचाकी वाहने नसतानाही लाभ अद्याप मिळाले नाहीत, अशीही तक्रार पुढे आली आहे.

## १६ महिन्यांचा पगार थकल्याने सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षकांचे कामबंद आंदोलन

**पुणे, ता. २४ :** पुण्यातील नामांकित सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गेल्या तब्बल महिन्यांपासून पगार मिळालेला नाही. या गंभीर परिस्थितीविरोधात अखेर कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. वेतन थकबाकीमुळे अनेक अनुभवी शिक्षकांनी नोकरी सोडली असून, नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षकांनाही नियमित पगार मिळत नसल्याने संस्थेतील शिक्षण व्यवस्था संताप व्यक्त केला जातोय.




कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, संस्थेच्या प्रशासनाकडे वारंवार निवेदनं देऊन, बैठका घेऊनही ठोस तोडगा निघालेला नाही. लवकरच पगार दिला जाईल अशी आश्वासनं दिली जातात, मात्र प्रत्यक्षात काहीच घडत नसल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे. वाढती महागाई, कर्जाचे हप्ते आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे अनेक कर्मचारी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

या आंदोलनाचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत आहे. वर्ग नियमित होत नाहीत, अभ्यासक्रम रखडत आहे आणि परीक्षा नियोजनावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सिंहगडसारख्या मोठ्या शिक्षण संस्थेत ही परिस्थिती निर्माण होणे चिंताजनक असल्याचे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

तात्काळ थकबाकी अदा न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला असून, याची दखल शासन आणि संबंधित शैक्षणिक प्राधिकरणांनी घ्यावी, अशी मागणी होत आहे.

## पिंपरी दुमाला येथील सोमेश्वर मंदिरातील दानपेटी चोरीला

**पुणे, ता. २४ :** शिरूर (जि. पुणे)तालुक्यातील पिंपरी दुमाला येथील पुरातन व भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री. सोमेश्वर मंदिर देवस्थानामध्ये अज्ञात चोरट्यांनी दानपेटी चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे परिसरातील भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज (ता. २३) पहाटे तीन ते चार वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मंदिर परिसरात प्रवेश करून थेट दानपेटी उचलून नेली.विशेष म्हणजे ही संपूर्ण चोरीची घटना मंदिर परिसरात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून,त्या फुटेजच्या आधारे पोलिसांकडून चोरट्यांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी करून पंचनामा केला. मंदिर समितीचे पदाधिकारी, विश्वस्त तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने मंदिर परिसरात जमा झाले होते. पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू असून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, दानपेटीतून नेमकी किती रक्कम चोरीस गेली याचा अंदाज घेण्याचे काम मंदिर प्रशासनाकडून सुरू आहे. परिसरात अलीकडच्या काळात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाकडे रात्रीची गस्त वाढवावी तसेच मंदिर परिसरात अधिक सुरक्षेची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

## मनोज जरांगे-पाटील 'सुपारी' प्रकरणातील एका आरोपीला जामीन मंजूर

### धनंजय मुंडेंवरील आरोपांबाबत सस्पेन्स वाढला

**छत्रपती संभाजीनगर, ता. २४ :** मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात खळबळ उडवणाऱ्या सुपारी प्रकरणात आता महत्त्वाची घडामोड घडली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना संपवण्यासाठी दोन कोटी रुपयांची सुपारी दिल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात तीन आरोपींपैकी एका आरोपीला न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. कांचन साळवी असे या आरोपीचे नाव असून, जवळपास दोन महिन्यांनंतर हा जामीन मंजूर झाला आहे.

या प्रकरणात अमोल खुणे आणि दादा गरड यांनी अडीच कोटी रुपयांची सुपारी स्वीकारल्याचा



आरोप आहे, तर कांचन साळवी याने या दोघांमध्ये आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यात मध्यस्थी केल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला होता. या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली होती. आरोपींच्या वतीने औरंगाबाद खंडपीठात जामिनीसाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. न्यायालयाने चार्जशीटमध्ये ठोस पुरावे आढळून न आल्याचे नमूद करत कांचन साळवी यांचा जामीन अर्ज मंजूर केला.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अधिक गंभीर आहे. मनोज जरांगे पाटील यांनी थेट धनंजय मुंडे यांच्यावर आपल्याला मारण्यासाठी सुपारी दिल्याचा आरोप केला होता. या आरोपांना बळ देण्यासाठी त्यांनी दोन ऑडिओ क्लिपही सार्वजनिक केल्या होत्या. त्यातील एका क्लिपमध्ये धनंजय मुंडे आणि एका आरोपीतील संभाषण असल्याचा दावा करण्यात आला होता, ज्यामुळे राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली.

धनंजय मुंडे यांनी मात्र हे सर्व आरोप ठामपणे फेटाळले. उलट त्यांनी जरांगे पाटील यांना नार्को टेस्ट आणि सीबीआय चौकशीचे आव्हान दिले. जरांगे पाटील यांनीही हे आव्हान स्वीकारत, स्वतःचीही नार्को टेस्ट करण्याची तयारी दर्शवली होती. त्यांनी या कथित कटामागे बदनामी, थेट हत्या किंवा औषध देऊन घातपात असे तीन शक्य मार्ग असल्याचाही दावा केला होता.

कांचन साळवी यांना जामीन मिळाल्याने या प्रकरणाच्या ताकदीवर आणि तपासाच्या दिशेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा केवळ एक गुन्हेगारी आरोप नसून, तो मराठा आंदोलन, सत्ताधारी नेते आणि विरोधक यांच्यातील संघर्षाचे प्रतीक ठरला आहे. पुढील काळात उर्वरित आरोपींबाबत न्यायालय काय भूमिका घेते आणि या आरोपांचा राजकीय परिणाम कसा होतो, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.